*ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पालगतच्या गावांमध्ये फिरते रूग्णालय उपलब्ध होणार*
*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार*
=================================================================

चंद्रपूर तालुक्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पालगतच्या गावांमध्ये उत्तम आरोग्य सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने फिरते रूग्णालय नागरिकांच्या सेवेत लवकरच रूजु होणार आहे.

प्रामुख्याने चंद्रपूर तालुक्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पालगतच्या आदिवासीबहुल गावांमधील सुमारे 70 हजार नागरिकांना या फिरत्या रूग्णालयाच्या माध्यमातुन आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. अनेक गावांमधील नागरिक बरेचदा औषधोपचारासाठी रूग्णालयांच्या ठिकाणी पोहचू शकत नाही व त्यांच्या आजाराचे योग्य निदान होवू शकत नाही, अशा गावांमधील नागरिकांना या फिरत्या रूग्णालयाच्या माध्यमातुन आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार करीत आहे. उर्वी अशोक तिरामल या सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने हे फिरते रूग्णालय अर्थमंत्र्यांच्या पुढाकाराने या परिसरात नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी लवकरच दाखल होत आहे. दिनांक 14 सप्टेंबर रोजी सायं. 4.00 वा. चंद्रपूर तालुक्यातील पिंपळखुट या गावात या फिरत्या रूग्णालयाचे लोकार्पण होणार आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चंद्रपूर जिल्हयात आरोग्य सेवेच्या क्षेत्रासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय झाले असून प्रामुख्याने शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जनतेच्या सेवेत रूजु झाले आहे. चंद्रपूर येथे टाटा ट्रस्टच्या मदतीने लवकरच कॅन्सर हॉस्पीटलची सुरूवात होणार असून नक्षलग्रस्त व आदिवासी भागातील पहिले कॅन्सर हॉस्पीटल ठरणार आहे. चंद्रपूर जिल्हयात पहिल्यांदाच रेल्वेमार्फत लाईफलाईन एक्सप्रेसच्या माध्यमातून रूग्णसेवा त्यांच्या पुढाकाराने उपलब्ध झाली आहे. खनिज विकास निधीच्या माध्यमातुन आदिवासी बहुल भागातील भंगाराम तळोधी, नांदा, जिवती आणि राजोली या गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे उपलब्ध झाली आहे. बल्लारपूर येथे ग्रामीण रूग्णालय, ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र, वसतीगृह, मेस या सोयींसह जनतेच्या सेवेत रूजु झाले आहे. बल्लारपूर तालुक्यातील मानोरा तसेच पोंभुर्णा तालुक्यातील उमरी पोतदार येथे विशेष बाब या सदराखाली प्राथमिक आरोग्य केंद्राला मान्यता मिळाली आहे. बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच पोंभुर्णा येथे ग्रामीण रूग्णालयाला मंजूरी व 15 कोटी रू. खर्चुन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सातत्याने आरोग्य शिबीरांचे आयोजन करून त्या माध्यमातुन रोगनिदानासाठी त्यांनी नेहमी पुढाकार घेतला आहे. नेत्रचिकीत्सा शिबीरांच्या माध्यमातुन नेत्रचिकीत्सा व चष्मे वितरण तसेच मोतिबिंदू शस्त्रक्रिया हा उपक्रम त्यांनी जिल्हाभर राबविला आहे. आदिवासीबहुल गावांमध्ये फिरत्या रूग्णालयाच्या माध्यमातुन आरोग्य सेवा पुरविण्याचा अर्थमंत्र्यांचा हा उपक्रम महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे
.